# <u>प्रेसनोट</u> दि. १८/०३/२०२४

**करुज तलाठी कार्यालय, वडगाव ता. मावळ, जि. पुणे येथील तलाठयावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | वडगाव मावळ पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ४० वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | सखाराम कुशाबा दगडे, वय ५२ वर्ष, पद – तलाठी, सजा – करुज, वडगाव, ता. मावळ, जि. पुणे (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ५०,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | त्यापैकी पहिला हप्ता २५,०००/- रुपये (पंचवीस हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | १५/०३/२०२४ |
| सापळा दिनांक | १८/०३/२०२४ |

ठिकाण :- विठ्ठल रुक्मिनी मंदीरासमोर, जुना मुंबई-पुणे हायवेलगत, मोकळया जागेत, वडगाव, ता. मावळ, जि. पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे शेतीच्या गटाची फोड केल्याची सात-बारा उता-यावर नोंद घेण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे लोकसेवक सखाराम दगडे यांनी ५०,०००/- रुपयांची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक सखाराम दगडे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे शेतीच्या गटाची फोड केल्याची सात-बारा उता-यावर नोंद घेण्यासाठी पंचासमक्ष ५०,०००/- रुपयाची लाच रक्कमेची मागणी केली व आज दि. १८/०३/२०२४ रोजी लोकसेवक सखाराम दगडे यानी तक्रारदार यांचेकडून त्यापैकी पहिला हप्ता म्हणून रुपये २५,०००/- (पंचवीस हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध वडगाव मावळ पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विरनाथ माने तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.